| MHLA120039892022 | नि.दि.दा.क्र.११९४/२०२२<br>मधुकर वि. माधव |
|---|---|

## नि.क्र.४० खालील आदेश

प्रस्तुत अर्ज गैरअर्जदार क्र.२ यांनी त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश बाजुला करण्यासाठी (set–aside) दाखल केलेला आहे. त्यावर अर्जदारातर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला. परंतु पुरेशी संधी देवूनही अर्जदाराने आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज विनाम्हणणे पुढे चालविण्यात आला.

२. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता अर्जदाराने सदरचा अर्ज वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र.२ हे आजारी असल्याने सदर प्रकरणात हजर राहू शकले नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी सदर गैरअर्जदारास हजर होवून कैफियत दाखल करण्याची नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमुद केलेले कारण व कायदेशिर बाब विचारात घेता सदर गैरअर्जदारास त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असे असले तरी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करण्यास गैरअर्जदारास विलंब झालेला आहे. त्यामुळे अशा परिस्थीतीत गैरअर्जदारावर खर्च लादणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

गैरअर्जदाराचा सदर अर्ज नि.क्र.४० अर्जदारास रक्कम रु.५००/– देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.02.15 17:18:48 +0530

(आर. डी. खराटे)

दि.१५/०२/२०२५

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, निलंगा